स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# कामाख्या देवीच्या मंदिरात 65 रेडे कापून खाणाऱ्या सरकारला मांस विक्री बंद करण्याचा अधिकार नाही!!

छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे, बाजीराव पेशवे वरण-भात, तूप खाऊन लढायला गेले का? ते ही मांसच खात होते!!

15 ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन आनंद साजरा करण्याचा दिन आहे, हा धार्मिक उत्सव अजिबात नाही, हा शौर्य दिवस आहे!!

सीमेवरच्या सैन्याला सुद्धा मांस खावेच लागते. वरण-भात, तूप, पोळी, श्रीखंड खाऊन युद्ध लढता येत नाही. तुम्ही महाराष्ट्राला नपुंसक बनवत का?



## शिवसेना उबाठा गटाचे फायर ब्रँड नेते खा. संजय राऊत यांची सडकून टीका

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांचे मावळे वरण-भात तूप खाऊन लढायला गेले का ते मांस खात होते बाजीराव पेशवे देखील मास खात होते. त्याशिवाय युद्धावर लढता येत नाही. आता सीमेवरच्या सैन्याला सुद्धा मांस खावेच लागते. वरण-भात, तूप, पोळी, श्रीखंड खाऊन युद्ध लढता येत नाही. तुम्ही महाराष्ट्राला नपुसक बनवत आहात, असे म्हणत उबाठाचे फायर ब्रँड नेते संजय राऊत यांनी स्वातंत्र्यदिनी मांस विक्री आणि कत्तलखाने बंद या निर्णयाविरुद्ध सरकारवर तोफ डागली.



### 15 ऑगस्ट धार्मिक उत्सव नसून तो फक्त शौर्य दिवसच!

देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्राला कोणाच्या दबावाखाली शाकाहारी राज्य घोषित केले आहे का? असा सवाल उबाठाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे. तर मुंबई पुण्यासारख्या शहरांमध्ये नॉनव्हेज खाणाऱ्यांना प्रवेश दिला जात नाही, घर विकले जात नाही, यावर संघर्ष सुरू आहे. आता 15 ऑगस्ट रोजी मनपा फतवा काढते मांस विक्रीवर बंदी आणते. स्वातंत्र्य दिन हा आनंद साजरा करण्याचा दिन आहे, हा धार्मिक उत्सव नाही हा शौर्य दिवस आहे. हे स्वातंत्र्य देवेंद्र फडणवीस, अमित शहा, नरेंद्र मोदी यांच्यामुळे मिळालेले नाही. स्वातंत्र्य मिळावे यासाठी अनेकांनी बलिदान दिले. त्यात भाजपचा आणि मांस न खाणाऱ्याचा काही संबंध नव्हता. सरकारकडे मागणी केली कुणी की स्वातंत्र्यदिनी मांस विक्री करू नये अशी. हे काय नवीन थोतांड आहे, याचे जनक कोण आहेत.

### महाराष्ट्राला नपुसक बनवता का?

देवेंद्र फडणवीस म्हणतात काँग्रेसच्या काळात त्यांचे सोडा, तुमच्या काळात काय सुरू आहे. काहीही झाले की, ही लोकं काँग्रेसच्या काळात हे झाले म्हणतात. तुमच्या स्वप्नात सुद्धा तुमच्या छातीवर काँग्रेस बसलेले आहे. यांना काहीही विचारा काँग्रेसच्या काळात असे म्हणतात. तुम्ही काय महाराष्ट्र नपुसक बनवत आहात का?

### गुवाहाटीला रेड्याचे मांस प्रसाद म्हणून खाल्ले!

रेडे कापून सरकार आले तेव्हा काही लोकांनी रेड्याचे मास प्रसाद म्हणून खाल्ले आहे. मला माहित आहे मी तिथे होतो. नंतर गुवाहाटीमध्ये बकरे, रेडे, बदक खाणाऱ्यांना मांस बंदी करावी वाटते, मला याचे आश्चर्य वाटत आहे. गुवाहाटीची ती एक परंपरा आहे प्राणी कापून त्याचा प्रसाद ठेवला जातो. तो काही लोकांनी खाल्लाही आणि ती लोकं आम्हाला शाकाहारी व्हा असे सांगतात.

### फडणवीसांना शिंदे गटाकडे दुर्लक्ष करण्याच्या सूचना

दिल्लीमधून देवेंद्र फडणवीस यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. या कटकटी होतच राहणार आहेत. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या लोकांना फार गांभीर्याने घेण्याची गरज नाही, अशी मला पक्की माहिती मिळाली आहे. शिंदे गटाकडे दुर्लक्ष करा आणि राज्य चालवा, अशी सूचना दिल्लीतील नेत्यांनी सांगितली आहे.



## टेंभुर्णी अॅट्रॉसिटी प्रकरणातील तीन आरोपींचा जामीन फेटाळला

जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या आरोपींना न्यायालयाचा दणका

बीड : प्रतिनिधी



शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी येथील अॅट्रॉसिटी अत्याचार प्रकरणातील गजाआड असलेल्या दोन आरोपींचा तसेच एका फरार आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड यांनी फेटाळून एक प्रकारे जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमकी प्रकरणात न्यायालयाने आरोपींना दणका दिला आहे.

या प्रकरणाबाबत थोडक्यात माहिती अशी की, मौजे टेंभुर्णी ता. शिरूर जि. बीड येथील रहिवासी काकासाहेब मारुती ढगे हे दिनांक 19 जुलै रोजी दुपारी गावातील मारुतीच्या मंदिरामध्ये गप्पा मारत बसले होते त्यावेळी गावातीलच संपत बबन वनवे व त्याचा भाऊ सुनील बबन वनवे हे त्या ठिकाणी आले व सुनील बबन वनवे याने नशेत असताना बाटलीतील पाणी पिऊन पाण्याची गुळणी फिर्यादीचे अंगावर टाकली आणि दोन्ही भावांनी फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करून मारोती मंदिरातून उठून जा असे म्हणून शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी देऊन सार्वजनिक ठिकाणी फिर्यादीचा अपमान केला या अनुषंगाने फिर्यादीने शिरूर पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरुद्ध गु.र.नं .212/2025 नुसार अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये तसेच भारतीय न्याय संहिता मधील नवीन कलमानुसार गुन्हा दाखल केला होता. त्या अनुषंगाने शिरूर पोलिसांनी दोन्ही आरोपींना गजाआड केले तब्बल वीस दिवसांहुन अधिक काळ जिल्हा कारागृहात बंद असलेल्या आरोपींनी अखेर त्यांचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय बीड

● पान ३ वर...

## डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन 14 सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे : एस.एम.देशमुख

मुंबई : प्रतिनिधी



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम असलेल्या "डिजिटल मिडिया परिषदे" चे पहिले राज्यव्यापी अधिवेशन 14 सप्टेंबर 2025 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली आहे.

डिजिटल मिडियात काम करणारया पत्रकारांसाठी अ.भा. मराठी पत्रकार परिषदेने डिजिटल मिडिया परिषद या नावाचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. राज्यातील 30 जिल्ह्यात आता डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या असून या माध्यमातील 2000 पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत. उर्वरित जिल्ह्यात शाखा स्थापन करण्याची प्रकिया सुरू आहे.
परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणारया अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश आहे.

14 सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल. डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं होतील. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणारया संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल. डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही. अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडली जाणार आहे. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स

● पान ३ वर...



## हभप. डॉ. विजयकुमार फड यांच्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध

नेवपूर मत्स्य तलाव अध्यक्ष तुकाराम वानखेडे यांच्या हस्ते महाराजांचा तळ्याकाठी सत्कार

चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव

अंगारकी संकष्टी चतुर्थी च्या निमित्ताने गणेश टेकडी येथे आयोजित कीर्तनाला हजारो भाविकांची गर्दी लाभली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कीर्तनकार तथा सेवा निवृत्त अतिरिक्त विभागीय आयुक्त हभप डॉ. विजयकुमार फड हे होते, महाराजांनी कीर्तनातून आध्यत्मिक व सामाजिक संदेश दिला. तसेच या आरतीचे मानकरी म्हणून अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेचे प्रदेशाध्यक्ष श्री .तुकाराम वानखेडे हे होते .या कार्यक्रमाचे आयोजन समस्त विघ्नेश्वर भक्त मंडळी गणेश टेकडी च्या वतीने करण्यात आले होते. कीर्तन झाल्या नंतर कीर्तनकार हभप डॉ. फड महाराज यांनी नेवपूर मत्स्य व्यवसाय संस्थेच्या नेवपूर तलावातील संस्थेच्या कार्यालयाला भेट दिली व बोटीत बसून निसर्गाचा आनंद घेतला यावेळी संस्थेचे चेअरमन श्री. तुकाराम वानखेडे यांनी हभप डॉ. फड महाराज यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला व आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील नागरिकांनी अलोट गर्दी केली होती यांचसोबत कार्यक्रमाला ह .भ .प राम महाराज ढमाले,ह .भ .प राहुल महाराज, ह .भ .प संदीप महाराज,ह .भ .प बजरंग महाराज यांनी सुद्धा आपल्या विशेष शैलीतून कीर्तन करून आध्यत्मिक संदेश दिला.



मुस्कटदाबीच्या विरोधात मोर्चा आक्रमक

राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या खांद्याला खांदा लावून रजनीताई पाटील लढल्या....

## लोकशाहीच्या संरक्षणासाठी खा. रजनीताई पाटील आक्रमक

केज : प्रतिनिधी

राज्यसभेच्या खासदार संसदरत्न, कायम सामाजिक व सर्वसामान्य नागरिकांचे विविध विषय अभ्यासपूर्ण आणि आक्रमकपणे संसदेत मांडणाऱ्या काँग्रेसच्या खा रजनीताई पाटील
यांनी काल इंडिया आघाडीच्या आंदोलनात आक्रमक भूमिका घेतली. निवडणूक आयोगाने घेतलेली एकतर्फी भूमिका ही लोकशाहीला घातक असून काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी अतिशय महत्वाच्या मुद्याला हात घातला असून यासाठी विरोधी बाकावरील सर्व खासदार या आंदोलनात सामील झाले होते.

राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या खांद्याला खांदा लावून बीड च्या खासदार रजनीताई पाटील या आंदोलनात होत्या अक्षरश: सरकारने पोलिसांच्या दडपशाही ने हे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न केला परंतु खा. राजनीताई पाटील यांनी



महिला खासदार असताना देखील या विरोधाला न जुमानता अडवण्यासाठी टाकलेले बॅरिकेट ढकलून देऊन पुढे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु भेटण्यासाठी जात असताना, इंडिया आघाडीतील खासदारांना पोलिसांकडून अडवण्यात आले आणि ताब्यातही घेण्यात आले .तरीही त्या मागे हटल्या नाहीत. मत चोरीच्या विरोधात मोठे आंदोलन केले गेले. मतमोजणीत पारदर्शकता, EVM + VVPAT ची अनिवार्य पडताळणी आणि मतदार याद्यांतील फेरफार थांबवण्याच्या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले
यावेळी खासदार रजनीताई पाटील आक्रमक झाल्या .ही लढाई राजकीय नाही ही लढाई लोकशाही, संविधान आणि 'एक व्यक्ती, एक मत' या अधिकाराच्या संरक्षणाची आहे ही भूमिका घेतली. लोकशाहीची होत असलेली मुस्कटदाबी विरोधात मोर्चा आक्रमक झाला. खा रजनीताई पाटील यांनी पुढाकार घेतला.

# मा.ना. छगनरावजी भुजबळ साहेबांना दैवत मानून ओबीसी समाजासाठी अहोरात्र लढणारा सच्चा समता सैनिक - ॲड. सुभाष (भाऊ) राऊत









भुतलावर जन्माला आलेला प्रत्येक माणूस आपण, आपलं कुटूंब, आपला संसार, आपला व्यवसाय या संकुचित विचारातच आपले आयुष्य जगत असतो ; परंतू हे विश्वची माझे घर ' असं समजून या भुतला-वरील प्रत्येक व्यक्तीशी आपलं काहीतरी नातं आहे . ज्यामुळे आपण येथील प्रत्येकाच्या कामी यावे असा विचार करणारे काही लोक आहेत . त्यांना स्वार्थी जीवन जगणे आवडत नाही . परोपकारातच ते आपलं आयुष्य जगत असतात . अशा व्यक्ती महान होतात . यातीलच एक नाव म्हणजे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य आणि ना . छगनराव भुजबळ साहेब यांना दैवत मानून ओबीसी समाजाच्या हक्कासाठी अहोरात्र लढणारा सच्चा समता सैनिक म्हणजे ॲड . सुभाष भाऊ राऊत आज दि .१५ ऑगस्ट रोजी त्यांचा वाढदिवस त्यानिमित्त त्यांना कोटी कोटी शुभेच्छा . . !

### आपण किती चांगले आहोत हे सांगतांना दुसऱ्यांना वाईट, हीन लेखणं त्यांच्या स्वभावात नाही!

ॲड . सुभाष भाऊ राऊत यांचा जनसंपर्क दांगडा असल्याने बीड जिल्हयातच नव्हे तर महाराष्ट्रात ते चांगलेच परिचित आहेत . समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष या पदावर कार्य करीत असतांना कार्यकर्ता कसा असावा याचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे . त्यांच्या कार्याची दखल घेऊन समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे कॅबिनेट मंत्री ना . छगनराव भुजबळ साहेब यांनी ॲड . सुभाष भाऊ राऊत यांची समता परिषदेच्या राज्य उपाध्यक्षपदी आणि आता प्रदेश सरचिटणीस पदी निवड केली आहे . मागील पंचवार्षिकमध्ये राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष पदही ( राज्यमंत्री दर्जा असलेले ) त्यांनी काही दिवस भूषविले . तसेच बीड नगरपालिका निवडणुकीत देखील दोन पंचवार्षिकला भरघोस मताने ते विजयी झालेले आहेत . बीड नगरपालिकेचे दहा वर्ष नगरसेवक आणि बांधकाम सभापती पद भूषविल्यामुळे त्यांचा बीड शहरात मोठा जनसंपर्क झालेला आहे . या कालावधीमध्ये अनेक गोरगरिबांची कामे त्यांच्या हातून झाली . ओबीसी समाजात त्यांचा जन्म झाला असल्याने ओबीसी समाजाबद्दल त्यांना आत्मियता असणे साहजीकच आहे . मात्र ओबीसी समाजाबरोबर इतर सर्वच समाजात त्यांना मानणारा वर्गही मोठा आहे . आपण किती चांगले आहोत हे सांगतांना दुसऱ्यांना वाईट, हीन लेखणं त्यांच्या स्वभावात नाही . प्रत्येकजण आपल्या जागेवर चांगला असतो . आपला बघण्याचा दृष्टीकोण जसा असतो तसा समोरचा व्यक्ती दिसतो हे सांगायला ते कधीच विसरत नाहीत .

### गेल्या पंचवीस वर्षांपासूनचा संघर्ष आज ही कायम!

गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष या पदावर काम करीत असतांना त्यांनी कुंभार, नाभीक, सुतार, भुई, सोनार, बंजारा, साळी, माळी, तेली, कोष्टी, लोहार, गुरव, बागवान, आतार, मन्यार, कासार अशा ओबीसी समुहातील लहान, लहान जातींना एकत्रीत करून ओबीसींचे मजबुत संघटन निर्माण केले आहे . ओबीसी चळवळीत काम करीत असतांना ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे नियमीत वाटप व्हावे, मंडल आयोगाची १०० टक्के अंमलबजावणी व्हावी, ओबीसीतील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण असावे अशा विविध प्रश्नांवर वेळोवेळी आंदोलने, मोर्चे, धरणे, रास्तारोको करून ओबीसी चळवळ गतीमान केली . त्यांनी काढलेला धक्का लागे बुक्का मोर्चा महाराष्ट्रात चांगलाच गाजला होता . काही महिन्यांपूर्वी त्यांनी ओबीसींचा महामुकमोर्चा काढून शासनाचे लक्ष वेधून घेतले होते . विशेष बाब म्हणजे या महामोर्चात पहिल्यांदाच विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, पुरूष जवळपास अडीच ते तीन लाख ओबीसी समाज बांधव सहभागी झाले होते .

### भुजबळ साहेबांना अटक झाल्यानंतर अनेकांनी चळवळीतून माघार घेतली परंतु सुभाष राऊत मागे हटले नाहीत!



आंदोलनांबरोबरच ओबीसी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभाचे ते प्रतिवर्षी आयोजन करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्याचे कार्य करतात . राज्यस्तरीय एकांकिका, नृत्य स्पर्धा, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षीका पुरस्कार असे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना व्यासपीठ निर्माण करून देण्याबरोबरच समाजातील गुणीजणांचा सत्कार करण्याचे कार्यही करतात . क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती अशा महापुरुषांच्या आणि संत महात्म्यांच्या जयंती, पुण्यतिथीमध्ये ते नेहमीच तन - मन - धनाने सक्रिय सहभागी असतात . ओबीसींचे राष्ट्रीय नेतृत्व स्व . गोपीनाथराव मुंडे यांचे निधन, ओबीसी चळवळीतील झुंजार नेतृत्व स्मृतीशेष हनुमंतराव उपरे यांचे निधन आणि ओबीसींचा बुलंद आवाज राष्ट्रीय नेते आ . छगनराव भुजबळ यांना अटक झाल्यानंतर ओबीसी चळवळ पोरकी झाली होती . अशा परिस्थितीत अनेकांनी ओबीसी चळवळीतून माघार घेतली . मात्र सच्चा कार्यकर्ता आणि समाजसेवक कधीच माघार घेत नसतो हे ॲड . सुभाष भाऊ राऊत यांनी दाखवून दिले . मा .ना . छगनराव भुजबळ साहेब यांच्यावर खोटे आरोप करून सुडबुध्दीने अटक केल्यानंतर ओबीसी चळवळीला खंड पडू न देता अधिक जोमाने ओबीसी चळवळ वाढविण्याचे काम ॲड . सुभाष भाऊ राऊत यांनी केले आहे . त्यांच्या विविध आंदोलनांनी जेलमध्ये असतांनाही ना . छगनराव भुजबळ साहेब यांच्या पाठीशी संपूर्ण ओबीसी समाज असल्याचे दाखवून देवून त्यांनी भुजबळांच्या भुजातील बळ वाढविण्याचे काम केले .

### ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी शत्रु निर्माण होऊ न देता प्रत्येकाला मित्र करीत ओबीसी चळवळ केली भक्कम!

नेत्यासाठी कार्यकर्ता, समाजासाठी समाजसेवक, मित्रांसाठी भाऊ, कुटूंबासाठी कर्तापुरूष अशा विविध भूमिका या जीवनपटावर राबवीत असतांना ॲड . सुभाष भाऊ राऊत यांनी शत्रु निर्माण होऊ न देता प्रत्येकाला आपला मित्र करीत ओबीसी चळवळ भक्कम केली . मराठा आरक्षणाची मागणी होत असताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कसल्याही प्रकारे धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे अशी भूमिका त्यांनी खंबीरपणे मांडली . काही दिवसांपूर्वी काही समाजकंटकांनी ॲड . सुभाष भाऊ राऊत यांना ओबीसी चळवळीपासून परावृत्त करण्यासाठी मनसुबे बांधले, त्यांना आयुष्यातून उठविण्याचा प्रयत्न केला तरी देखील कसल्याही प्रकारे न डगमगता त्यांनी पुन्हा सच्चा कार्यकर्ता कधीही संपत नसतो आणि त्याला संपविण्याचा प्रयत्न कोणीही करू शकत नाही हे समाजकंटकांना दाखवून दिले . ॲड . सुभाष भाऊ राऊत यांनी ओबीसी समाजाच्या मागण्यांसाठी तटस्थ उभे राहून ओबीसी आरक्षणाची चळवळ भक्कमपणे उभी केली . ओबीसी चळवळी बरोबरच डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्य पदी गेल्या तीन पंचवार्षिक पासून ते मोठ्या मताधिक्याने निवडून गोरगरीब किंवा ज्याचे काम विद्यापीठात अडले आहे . अशा प्रत्येकाचे काम नि : संकोचपणे ते करतात . या ठिकाणी समोरील व्यक्ती कोणत्या जाती धर्माचा आहे, याचा विचार देखील त्यांच्या मनात कधीच येत नाही . अशा ओबीसीतील उमलत्या नेतृत्वाचा आज वाढदिवस त्यानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो ही आई तुळजाभवानी चरणी प्रार्थना व वाढदिवसाच्या कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा . . . !

**निखिल शिंदे**
शहराध्यक्ष : समता परिषद बीड .

विशेष



## हिमाचलमध्ये पावसाचा हाहाकार, किन्नौर ढगफुटीने उध्वस्त; घरं-गाड्या पुरात गेल्या वाहून

किन्नौर : हिमाचल प्रदेशात निसर्गाने पुन्हा एकदा आपला प्रकोप दाखवला आहे . किन्नौर जिल्ह्यातील ऋषी डोंगरी खोऱ्यात झालेल्या ढगफुटीमुळे होजिस लुंगपा नाल्याला अचानक पूर आला . या पुरामुळे सतलज नदीच्या दुसऱ्या बाजूस चार जण अडकून पडले, तर एक व्यक्ती जखमी झाली . पुराचा जोर इतका प्रचंड होता की सीपीडब्ल्यूडीचा संपूर्ण कॅम्प वाहून गेला . घटनेची माहिती मिळताच, ट्रिपिक्स ब्रिगेडची बचाव पथके तात्काळ घटनास्थळी रवाना झाली . रात्रीच्या अंधारात, पाण्याच्या प्रचंड प्रवाहाशी झुंज देत आणि कठीण डोंगरी मार्ग पार करत त्यांनी अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला . लोकांना रात्रभर सुरक्षित ठेवण्यासाठी पथकाने विशेष हाय अल्टिट्यूड ड्रोन ( LDHA ) चा वापर करून अन्न, पाणी आणि इतर जीवनावश्यक वस्तू पुरवल्या . दरम्यान, जखमी व्यक्तीला सुरक्षितपणे बाहेर काढून रेकाँग पेओ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले . या बचाव मोहिमेत दाखवलेली तत्परता आणि धैर्य, नैसर्गिक संकटांमध्ये मानवी जीव वाचवण्यासाठी किती महत्त्वाची असते, याचे उत्तम उदाहरण ठरली .

### प्रशासन सतर्क

हिमाचल प्रदेशात गेल्या काही दिवसांपासून निसर्गाचा कहर सुरू असून प्रशासन सतत सतर्क मोडवर आहे . किन्नौरमधील ढगफुटी आणि अचानक आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शिमला, लाहौल आणि स्पिती या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे . अनेक पूल प्रचंड पाण्याच्या लाटांमध्ये वाहून गेले आहेत, तर तब्बल ३०० हून अधिक रस्ते सध्या वाहतुकीसाठी बंद आहेत . गणवी खोऱ्यात काही दिवसांपूर्वी आलेल्या पुरामुळे एक पोलीस चौकी पूर्णपणे वाहून गेली, तर शिमला जिल्ह्यातील मुसळधार पावसामुळे अनेक व्यापाऱ्यांचे दुकानं व मालमत्ता पाण्याखाली गेली आहे . सुदैवाने, आतापर्यंत या घटनांमध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही . तरीही, हवामान विभागाने आणखी पावसाचा इशारा दिल्याने प्रशासन आणि स्थानिक बचाव पथके कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज राहिली आहेत .

## गेवराईच्या भविष्याचा तेजस्वी तारा, लोकनेत्याची खरी सावली म्हणजे यशराज पंडित

गेवराई तालुक्याच्या राजकीय क्षितिजावर यशराज बदामराव पंडित हे नाव आज एका चमकत्या ताऱ्यासारखे उदयास आले आहे . माजी मंत्री, लोकनेते बदामराव पंडित यांच्या पावलावर पाऊल ठेवत, यशराज यांनी गेल्या दोन वर्षांत आपल्या प्रेमळ स्वभावाने, कर्तृत्वाने आणि जनसेवेच्या अटळ व्रताने तरुणाईच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे . त्यांचा आजचा वाढदिवस हा केवळ व्यक्तिगत उत्सव नसून, गेवराईच्या युवा शक्ती आणि जनसामान्यांच्या आकांक्षांचा उत्सव आहे . यशराज हे केवळ एक नेता नाहीत, तर ते तरुणांचे मित्र, ज्येष्ठांचे लहान भाऊ आणि सर्वसामान्यांच्या हृदयातील विश्वासाचे प्रतीक आहेत .

बदामराव पंडित, ज्यांना गेवराई आणि बीड जिल्ह्यात ' आबा ' म्हणून आदराने संबोधले जाते, त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत जनसेवेला नेहमी प्राधान्य दिले . सत्तेच्या मोहमायेत न अडकता, त्यांनी गेवराईच्या मातीत रुजलेली जनसेवेची परंपरा जपली . आबांचा हा वारसा यशराज यांनी केवळ स्वीकारला नाही, तर तो नव्या जोमाने आणि आधुनिक दृष्टिकोनाने पुढे नेला आहे . गेल्या दहा वर्षांत सत्ता नसताना, राजकीय साधने मर्यादित असताना आणि काही कार्यकर्ते दुरावले असतानाही, यशराज यांनी आपल्या स्वभावगुणांनी आणि मेहनतीने पुन्हा एकदा तरुणांची फौज उभी केली आहे .
दिल्लीत यूपीएससीच्या तयारीत रमलेले यशराज, ज्यांच्या मनात आयपीएस होण्याचे स्वप्न होते, त्यांनी गेवराईच्या मातीत परत येताच आपल्या कर्तृत्वाने सर्वांना थक्क केले . आबांच्या सावलीप्रमाणे त्यांनी तरुणाईला प्रेमाने जवळ घेतले आणि त्यांच्या हृदयात स्थान मिळवले . त्यांचा साधा, प्रामाणिक आणि सर्वांना आपलंस करणारा स्वभाव हा त्यांच्या यशाचा खरा आधार आहे .

यशराज पंडित यांचे नेतृत्व हे केवळ राजकीय नाही, तर ते सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचे प्रतीक आहे . गेवराई तालुक्यातील गल्लीबोळांपासून ते गावागावांत, यशराज यांनी आपल्या कार्याने आणि संवादाने लोकांना जोडले आहे . विरोधक असो वा स्वपक्षीय, यशराज प्रत्येकाशी मैत्रीचे नाते जोडतात . त्यांचा एक खास गुण म्हणजे ते कधीच कार्यकर्त्यांमध्ये भेदभाव करत नाहीत . विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांचीही विचारपूस करून, त्यांना आपलंस करून त्यांचे प्रश्न सोडवतात . हा त्यांचा सर्वसमावेशक दृष्टिकोन गेवराईच्या राजकारणाला एक नवा आयाम देतो .

यशराज यांचे उच्च शिक्षण आणि माजी मंत्री बदामराव पंडित व आई गिरिकाभाभी पंडित यांचे संस्कार यांनी त्यांना सुसंस्कृत आणि जबाबदार नेतृत्वाची जाण दिली आहे . लोकसेवा आयोगाच्या तयारीदरम्यान त्यांनी आत्मसात केलेली शिस्त आणि बौद्धिक क्षमता आज त्यांच्या राजकीय कार्यात दिसते . गेवराईच्या भविष्यासाठी त्यांच्याकडे एक स्पष्ट दृष्टिकोन आहे, जो आधुनिक आणि प्रगतिशील आहे . त्यांचे शिक्षण आणि राजकीय शिकवण यांचा संगम त्यांना इतरांपासून वेगळे ठरवतो .



यशराज पंडित यांनी आबांच्या पावलावर पाऊल ठेवताना स्वत :ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे . आबांनी ज्या पद्धतीने जनसेवेचा आदर्श घालून दिला, त्याचप्रमाणे यशराज देखील लोकांच्या सुख-दु :खात सहभागी होतात . मग ते रक्तदान शिबिरात सहभाग असो, गावातील लोकहिताचे आंदोलन असो, किंवा सामान्य कार्यकर्त्याच्या घरी जाऊन त्याची विचारपूस असो, यशराज प्रत्येक ठिकाणी स्वत :हून उपस्थित राहतात . त्यांचा हा सहज आणि प्रामाणिक स्वभाव लोकांना आपलंस करतो .

त्यांचे मोठे बंधू, माजी जिल्हा परिषद सभापती युद्धाजित पंडित, यशराज यांना खंबीर साथ देतात . युद्धाजित यांनी वडिलोपार्जित भूमिका बजावत यशराज यांना मार्गदर्शन केले आहे, ज्यामुळे यशराज यांचे नेतृत्व अधिक मजबूत झाले आहे . यशराज यांनी गेल्या विधानसभा निवडणुकीत आपले नेतृत्व सिद्ध केले, जिथे त्यांनी कार्यकर्त्यांना एकत्र आणून नव्या जोमाने प्रचार केला .

यशराज पंडित यांचे नेतृत्व हे गेवराईच्या तरुणाईसाठी एक प्रेरणास्थान आहे . त्यांनी दाखवून दिले आहे की खऱ्या नेत्याला सत्तेची गरज नसते, तर जनतेच्या मनात स्थान मिळवण्याची क्षमता हवी . गावागावांत पायी फिरताना, लोकांना आपलंस करताना, यशराज पंडित यांना कोणत्याही ओळखीची गरज भासत नाही . त्यांचा साधा स्वभाव आणि प्रामाणिक प्रयत्नच त्यांची खरी ओळख आहे .

यशराज यांनी गेवराईच्या राजकारणाला एक नवा वेग दिला आहे . त्यांचे कार्य केवळ राजकीय मर्यादेपर्यंत सीमित नाही, तर ते सामाजिक बदलाचे वाहक बनले आहेत . रक्तदान शिबिरापासून ते गावांसाठीच्या आंदोलनापर्यंत, यशराज प्रत्येक ठिकाणी तरुणाईला प्रेरणा देतात . त्यांचा हा उत्साह आणि जनसेवेची तळमळ कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करते .

गेवराई आणि बीड जिल्ह्यात यशराज पंडित हे आज एक ब्रँड बनले आहेत . त्यांचा स्वभाव केवळ स्वपक्षीयांनाच नव्हे, तर विरोधकांनाही प्रभावित करतो . त्यांच्या कार्याची प्रशंसा विरोधी पक्षातील कार्यकर्तेही करतात, हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी पावती आहे . यशराज यांनी दाखवून दिले आहे की खरा नेता हा लोकांच्या मनात राहतो, सत्तेच्या खुर्चीत नाही .

यशराज पंडित यांचा हा वाढदिवस हा गेवराईच्या तरुणाईसाठी आणि जनतेसाठी एक उत्साहवर्धक क्षण आहे . त्यांचे नेतृत्व, त्यांची जनसेवा आणि आबांच्या पावलावर पाऊल ठेवत स्वत :ची ओळख निर्माण करण्याची त्यांची जिद्द, यामुळे यशराज हे गेवराईच्या भविष्याचा तेजस्वी तारा आहेत . त्यांच्या या वाढदिवसानिमित्त प्रत्येक कार्यकर्त्याला प्रेरणा मिळेल, आणि गेवराईच्या राजकीय आणि सामाजिक बदलाचा नवा अध्याय यशराज यांच्या नेतृत्वाखाली लिहिला जाईल, यात शंका नाही . यशराज पंडित यांना पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा .



सांज दैनिक बीड वास्तव
सायं . दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी . बीड -४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले . संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट , निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद-विवाद बीड न्याय कक्षेत ) मो . 9022952922



# मुहूर्त ठरला! शिवसेना चिन्ह वादाचा मुद्दा; सर्वोच्च न्यायालयात सुनावणीची तारीख जाहीर

नवी दिल्ली : शिवसेना पक्ष आणि त्याच्या चिन्हावरील वादाचा प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या दालनात उभा आहे. या प्रकरणात सुनावणी होण्याची संभाव्य तारीख ८ ऑक्टोबर निश्चित करण्यात आली आहे. प्रकरणाशी संबंधित राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्यातील वादानुसार, राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागितला होता. त्यानुसार न्यायालयाने घटनापीठ स्थापन केले आहे, जे १९ ऑगस्टपासून संबंधित मुद्द्यांवर सुनावणी सुरू करणार आहे. या घटनापीठात न्यायमूर्ती सूर्यकांत यांचाही समावेश आहे. शिवसेना पक्षाचा चिन्ह आणि पक्षाबाबत अंतिम निर्णय ऑक्टोबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. संगणक प्रणालीत नव्याने ८ ऑक्टोबर ही तारीख दाखल करण्यात आली आहे. यामुळे दोन्ही बाजूंच्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालय अंतिम निर्णय देईल. त्यामुळे शिवसेना पक्षासाठी हा निर्णय आणि सुनावणीविषयक उत्सुकता केवळ काही दिवसांवर अवलंबून राहिली आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोरच शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा अंतिम निर्णय होणार आहे. ● पान ४ वर ...

# अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून सेवा केंद्रातून डोळस श्रद्धा व मनशांतीचे काम - चंद्रकांत मोरे

## ➤ गेवराईत सत्संग मेळावा उत्साहात संपन्न

गेवराई : प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातून अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून डोळस श्रद्धा सेवाभाव या माध्यमातून मनशांती करण्याचे काम भारतासह 21 देशात केले जात असून हा सेवा मार्ग घराघरात, मनामनात पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गुरुवर्य पुत्र चंद्रकांत ( दादासाहेब ) मोरे यांनी गेवराई येथे आयोजित सत्संग मेळाव्यात केले.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्रंबकेश्वर जिल्हा नाशिक यांच्या वतीने सुप्रजन्यवृष्टी व राष्ट्र कल्याणार्थ श्री रुद्र लिंगार्चन सोहळा गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित करण्यात आला होता. या सत्संग मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी चिंतेश्वर संस्थांचे मठाधिपती दिलीप महाराज घोगे यांचे प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, युवा नेते रोहित पंडित, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या गेवराई तालुका केंद्र निरीक्षक प्रतिनिधी सौ स्वरूपाताई रोहित पंडित, सौ गीता भाभी पवार, युवा नेते रणवीर पंडित आदींनी गुरुपुत्र चंद्रकांत ( दादासाहेब ) मोरे यांचे पुष्पहार करून स्वागत केले.

पुढे बोलताना गुरुपुत्र चंद्रकांत ( दादासाहेब ) मोरे म्हणाले की, श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या ग्राम अभियानांतर्गत 18 विभागाच्या माध्यमातून 20 टक्के अध्यात्म आणि 80 टक्के सामाजिक उपक्रम राबविले जातात. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून डोळस श्रद्धा, सेवाभाव यामधून मन :शांती प्रदान करण्याचे काम भारत देशासह जगातील 21 देशांमध्ये हजारो सेवा केंद्राच्या माध्यमातून चालू आहे. या सेवेचा कोट्यावधी भाविक अनुभव घेत आहेत. हरवलेली मन :शांती पुनर्जिवीत करण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा घराघरात, मनामनात पोहोचवणे ही खरी स्वामींची सेवा आहे असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन, छत्रपती शिवाजी महाराज आणि श्री स्वामी समर्थ महाराज यांचे पूजन करुन झाले.

याप्रसंगी गेवराई तालुक्यातील श्री स्वामी समर्थ भाविकांसह सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले. शहरासह तालुक्यातील सर्व साप्ताहिक केंद्रातील महिला, पुरुष, नागरिक मोठ्या संख्येने



उपस्थित होते. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या गेवराई तालुका केंद्र निरीक्षक प्रतिनिधी सौ स्वरूपाताई रोहित पंडित यांच्यासह त्यांच्या सहकारी सेवाकरांनी परिश्रम घेतले.

# डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन 14 सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे : एस.एम.देशमुख

● पान १ वरून ... तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख नाही. ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत.

प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत. त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे अधिवेशनात त्यासंबंधी देखील चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे.

डिजिटल मिडियाच्या या पहिल्या अधिवेशनास डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, कार्यक्रमाचे निमंत्रक आणि संभाजीनगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे.

# टेंभुर्णी अॅट्रॉसिटी प्रकरणातील तीन आरोपींचा जामीन फेटाळला

● पान १ वरून ... येथे दाखल केला होता. तसेच याच प्रकरणातील एक अन्य फरार आरोपी भीमा कराड हा स्वत :ची अटक टाळून अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी त्याने जिल्हा न्यायालयात धाव घेतली मात्र या प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे तसेच फिर्यादीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून गजाआड असलेल्या दोन्ही आरोपींचा तसेच अटकपूर्व जामीन मागितलेल्या एका आरोपीचा जामीन अर्ज मा. न्यायालयाने आज फेटाळला आहे, त्यामुळे जातीवाचक शिवीगाळ करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या मनोवृत्तीला एक प्रकारे न्यायालयाने मोठा दणका दिल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणात फिर्यादी पक्षातर्फे बीड येथील ज्येष्ठविधीज्ञ अॅड. अनिल बारगजे यांनी भक्कम बाजू न्यायालयासमोर मांडली तसेच कागदपत्रांचे पुरावे न्यायालयाच्या समक्ष सादर करून आरोपींनी कशाप्रकारे फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करून अपमान केला व जीवे मारण्याची धमकी दिली या बाबतचा योग्य युक्तिवाद केला, याबरोबरच फिर्यादीच्या वतीने अति .जिल्हा सरकारी विधीज्ञ अॅड. अजय तांदळे ,अॅड .आमेर काझी साहेब, बीड यांनी देखील भक्कम बाजू मांडली .व आरोपींचा जामीन फेटाळल्या कामी मोलाची कामगिरी बजावली, त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अभिनेता आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांचा माजलगाव सत्कार संपन्न



माजलगाव / प्रतिनिधी : लवकरच प्रसारित होणार असलेल्या वनवा या लघु चित्रपट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या औचित्याने राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार जाहीर झाला असून या चित्रपटात काम करणारे अभिनेते बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांचा माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव परिसर चे संस्थापक संपादक तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रदीप कुलकर्णी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मनोगतात प्रदीप कुलकर्णी म्हणाले की बाळासाहेब आडागळे यांनी पत्रकारिता क्षेत्रांमध्ये चांगले कार्य केले असून कमी वयात त्यांनी माजलगावची पत्रकारिता चांगलीच गाजवली आहे. त्यांनी आता अभिनयक्षेत्र निवडले असून या क्षेत्रात देखील ते चांगल्या प्रकारे काम करतील आणि आपल्या या अभिनयातून एक प्रकारचे समाज प्रबोधन करतील, अशी अपेक्षा आहे अशी अपेक्षा आहे.

त्यांना व अभिनेत्री सोनवणे यांना राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार जाहीर झाला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, आणि त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा प्रदान करतो. त्यांची उत्तरोत्तर अशीच प्रगती व्हावी आणि त्यांच्या हातून अभिनय क्षेत्रामध्ये चांगली कामगिरी घडावी अशा शुभकामना व्यक्त करतो अशा शब्दात प्रदीप कुलकर्णी यांनी त्यांच्या सत्काराच्या औचित्याने आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी संपादक परमेश्वर सोळंके, पत्रकार विष्णू उगले, पत्रकार अरविंद ओव्हाळ, पत्रकार अमर साळवे, पत्रकार विजय कापसे, पत्रकार संतोष रासवे, पत्रकार वाजेद पठाण, पत्रकार परमेश्वर चांदणे, पत्रकार शेख अखिल आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

सर्व उपस्थितांनी बाळासाहेब आडागळे आणि प्राची सोनवणे यांना हार्दिक शुभेच्छा प्रदान केल्या.

# कड्यामध्ये चौकीच्या हाकेच्या अंतराव अवैध धंदे सुरू!

## गुटखा, मटका, अवैध दारू विक्री जोमात!





आष्टी : प्रतिनिधी

कडा परिसरात जीवघेणा मावा मित्रण, सुगंधी सुपारी व आयुष्य उध्वस्त करणारा मटका यासह अवैध दारू विक्री चालु असून अनेकांचे संसार यामुळे उद्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अवैध धंद्यांची पाळेमुळे उखडून टाकावीत अशी मागणी जनतेतून जोर धरू लागली आहे.

कडा परिसरात ठिकठिकाणी मटक्याचे एजंट आहेत. त्यांचे या भागातील गावोगावी मटका बुकींगसाठी जाळे पसरले आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करीत मटका घेताला जात आहे. मोठ्या गावांतील तरूण मोठ्या संख्येने अवैध धंद्याकडे वळत आहेत. कमीत कमी भांडवलात अल्पावधीत अधिकाधिक पैसे मिळविण्याकडे त्यांचा ओढा वाढला आहे.

परिणामी गुटखा, मावा विक्री, मटका, अवैध व बेकायदा दारू विक्री, वाळू तस्करी अशा अनेक काळ्या धंद्यात तरूण गुरफटलेले दिसत आहेत. दररोज हजारोंचा मटका खेळून काही जण आपल्या सुखी संसाराला मोडकळीस आणत आहेत. खेड्यापाड्यातील अनेक जण कामाला जातो असे सांगून येथे दिवसभर मटका खेळत असतात. त्यांचे संसार उद्वस्त होवू लागले आहेत. परिणामी असंख्य कुटुंबीय या मुळे त्रस्त झालेले असल्याची परिस्थिती दिसून येत आहे. दिवसेंदिवस काळ्या धंद्ये वाढतच असल्याचे दिसून येत आहे? दरम्यान, आरोग्यास घातक असलेल्या गुटखा, मावा, सुगंधी सुपारीवर तर शासनाने बंदी घातली असतानाही सर्रास चोरून लपून गुटखा विक्रेते धंदा करीत आहेत. मटका व गुटख्याचा धंदा येथे सुरू असून बेकायदा दारू विक्रीही चालु आहे. काळ्या धंद्यात लाखोंची दररोज उलाढाल होत आहे. कमी अवधीत श्रीमंत होण्याच्या नादात तरूण धंदा, नौकरी, व्यवसाय करण्याकडे कानाडोळा करत आहेत. अवैध वाळू व्यवसायात तर असंख्य तरूण गुरूफटले आहेत. कित्येक महिन्यांपासून तालुक्याला राज्य उत्पादन शुल्कचे दर्शनच नाही. हे धंदे थांबवणे काळाची गरज आहे. आष्टी व परिसरातील बेकायदा धंद्यांची पाळेमुळे प्रशासनाने खाणुन काढवीत, त्यांच्यावर करडी नजर ठेवून कायद्याचा धाक निर्माण करावा, लोकांचे उद्वस्त होणारे संसार वाचावेत, असेही तालुक्यातील जनतेत बोलले जात आहे.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष

# जय महाराष्ट्र गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी शिवहार शेटे



माजलगाव / प्रतिनिधी : शहरातील गणेशोत्सवाच्या इतिहासात भव्य परंपरा जपणाऱ्या चांदीच्या गणेशमूर्तीच्या जय महाराष्ट्र गणेश मंडळ, शिवाजी महाराज चौक या प्रतिष्ठित मंडळाच्या अध्यक्षपदी श्री. शिवहार आप्पा शेटे यांची सर्वानुमते निवड झाली.

### चार दशकांची सेवा

१९८३ साली संस्थापक भवरलाल जी जांगिड यांच्या पुढाकाराने या मंडळाची स्थापना झाली. गेली ४२ वर्षे अखंडितपणे गणेशोत्सवाचे आयोजन करताना मंडळाने भक्तिभाव, सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याची परंपरा जपली आहे. मंडळाचे वैशिष्ट्य ११ किलो चांदीची गणेशमूर्ती २०१० साली ११ किलो वजनाची चांदीची गणेशमूर्ती साकारण्यात आली. माजलगाव शहरातील एकमेव अशी मूर्ती असलेले हे मंडळ गणेशभक्तांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. गणेशोत्सव काळात शहरासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात.

### नवीन पदाधिकारी मंडळाची घोषणा

मंडळाच्या काल झालेल्या बैठकीत पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली –अध्यक्ष : शिवहार आप्पा शेटे उपाध्यक्ष : रामभाऊ जगताप, सर्जेराव शिंदे कोषाध्यक्ष : अमोल कोळपकर सचिव : बालाप्रसाद मालपाणी, सुहास कराड, सुमित मिटकरी उत्सव समिती सदस्य : बाबासाहेब शिंदे, प्रशांत खुरपे, रमेश चौधरी महेश खामगावकर, सिद्धू पवार, भरत जोशी, अजय राठोड, विनोद गायकवाड. बैठकीस उपस्थित बैठकीस अमोल कराड, योगेश राठोड, राहुल जयस्वाल, कैलास जाधव, केशव कापसे, विजय जगताप, अरुण घेवारे, राहुल राठोड, श्याम पवार, दत्ता सावंत, योगेश गायकवाड, निलेश लंगडे, नितीन सरोदे, गजू चौधरी, शंभू कदम, राजेश कराड, राजू लांडे, राम पवार, श्रीनिवास वाशिंबे, अमर जगताप, राहुल आडे, अभय कदम, शिवा कदम, किशोर विभुते, मनोज राठोड, विशाल माने, नाना कदम, सचिन सुरवसे, वैभव मिटकरी, सुखदेव होके यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

### भव्य गणेशोत्सवाची आखणी

नवीन पदाधिकारी मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवात अधिक भव्य सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरणपूरक संकल्प हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. बैठक संपल्यानंतर आभार प्रदर्शन अध्यक्ष श्री. शिवहार आप्पा शेटे यांनी केले.

## हर घर तिरंगा, मोहिमेअंतर्गत त्र्यंबकेश्वर विद्यालयात ध्वजारोहण



विहामांडवा : 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त 13,14,15 असे सलग तीन दिवस ध्वजारोहण होणार आहे. त्याचाच भाग म्हणून 13 ऑगस्ट रोजी पैठण तालुक्यातील नवगाव येथील त्र्यंबकेश्वर माध्यमिक विद्यालयात येथे 7 :50 वाजता विद्यालयाचे मुख्याध्यापक समशेर पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. व स्वतंत्र्य दिनानिमित्त शालेय स्तरावर विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी केदार सर, परळकर सर, डुकरे सर, रावस सर, गोरे सर, काळे मॅडम, शेख सर, अटोले सर, शिंदे सर, नजीर मामु आदी उपस्थित होते.

# सकारात्मक इतिहासाच्या मांडणीतूनच राष्ट्राला गतवैभव प्राप्त होईल – डॉ. शरदराव हेबाळकर



माजलगाव / प्रतिनिधी : सकारात्मक इतिहासाच्या मांडणीतूनच राष्ट्राला गतवैभव प्राप्त होईल असे प्रतिपादन अखिल भारतीय इतिहास संकलन योजनेचे माजी राष्ट्रीय महासचिव व ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. शरदराव हेबाळकर यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय इतिहास विभाग, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र व इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नेतृत्व, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक पुनर्जागरण या विषयावर आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी भा. शि. प्र.प्र. संस्थेच्या उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर या तर स्थानिक शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह अँड. विश्वास जोशी, अभय कोकड, एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, संयोजक डॉ. गोरक्षनाथ फसले, डॉ केदारनाथ मालू, डॉ. रवी सातभाई, डॉ. धनंजय जवळेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. शरदराव हेबाळकर म्हणाले की, नकारात्मक इतिहासाच्या मांडणीमुळे मध्यंतरीच्या काळात भारतीयांचा आत्मविश्वास हा खालावलेला दिसून येत होता. परंतु अहिल्यादेवी सारख्या देशभक्त व स्वातंत्र्यसेनानींचा इतिहास तोही खरा इतिहास आपण जर समाजासमोर आणला तर आजची परिस्थिती बदलल्याशिवाय राहणार नाही. अध्यक्षियसमारोपातज्योतीताई ठाकूर म्हणाल्या की, अहिल्यादेवी होळकरांचे कार्य आपण इंदोर या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष रूपाने जर पाहिले तर त्यांचा आदर्श पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल. समारोप सत्रात डॉ. केदारनाथ मालू यांनी दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत अन्नदान केल्यामुळे त्यांचा व ऐतिहासिक शिल्पसृष्टी प्रदर्शनी लोकांसमोर साकारल्यामुळे सेवानिवृत्त शिक्षक उद्धव विभुते यांचा देखील विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यशाळेविषयी वैशाली पुष्कर, बेबी घोरगे, केदार वाघमारे यांनी कार्यशाळेच्या सकारात्मक आयोजनाबाबत मनोगते व्यक्त केली. कार्यशाळेत पेपर वाचन केल्याबद्दल बेबी घोरगे व सुवर्णा बुरांडे दोन संशोधक विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले तर आभार प्रा. प्रतिभा जाधव यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ‘हर घर तिरंगा’ मोहिमेत कन्नड न.प.ची लक्षवेधक रॅली

देशभक्तीच्या घोषणांनी दुमदुमले कन्नड शहर



कन्नड : विशाल भालेराव

स्वातंत्र्य दिनानिमित्त संपूर्ण देशभर सुरू असलेल्या ‘हर घर तिरंगा’ मोहिमेला कन्नड नगरपरिषदे ने भव्य रॅलीच्या माध्यमातून वेगळेच स्वरूप दिले. शहरातील मुख्य रस्त्यांवर आज सकाळी काढलेल्या या रॅलीत शिक्षक, स्वयंसेवक, नगरसेवक व नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

रॅलीची सुरुवात कन्नड नगर परिषद कार्यालयापासून झाली व मुख्य चौक, बसस्थानक, बाजारपेठ परिसर मार्गे ती पुन्हा नगरपरिषद येथे संपन्न झाली. हातात तिरंगा आणि ओठांवर “भारत माता की जय”, “वंदे मातरम्” अशा देशभक्तीच्या घोषणा देत सहभागींच्या उत्साहाने शहरातील वातावरण भारावून गेले. या रॅलीत, न.प. अधिकारी भाग्यश्री बेडगे, प्रशांत देशपांडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. रॅलीदरम्यान नागरिकांना घराघरात तिरंगा लावण्याचे आवाहन करण्यात आले. सहभागींनी देशभक्तीपर गाणी व घोषवाक्यांद्वारे जनजागृती केली.

कन्नड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव यांनी सांगितले की, “ही रॅली केवळ कार्यक्रम नसून देशाविषयी असलेले प्रेम व अभिमान लोकांच्या मनात दृढ करण्याचे साधन आहे.

## हरकी लिमगाव शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

### सलग तिस-यांदा वर्षी बिनविरोध निवड




माजलगाव / प्रतिनिधी : तालुक्यातील हारकी लिमगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड झाली असुन सलग तिस–यांदा बिनविरोध निवड होणारी ही जिल्हा परिषद शाळा ठरली आहे.

आरटीई अॅक्ट २००९ अंतर्गत प्रति दोन वर्षानंतर नविन शालेय व्यवस्थापन समितीची पुर्नगठण करण्यात येते. त्यानुसार दि. १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हारकी लिमगाव येथे नविन शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणुन रामेश्वर भगवान शिंदे, उपाध्यक्ष सौ. ज्योती आसाराम नवगरे, सदस्य म्हणुन सौ. अश्विनी गोविंद शिंदे, सौ. गंगासागर भरत गायकवाड, सौ. अंबिका शिवाजी बोबडे, हनुमंत विठ्ठल कोल्हे, अनिल वंकर निसर्गंध, राजेभाउ दशरथ फुनगे, नारायण प्रभाकर रंजवे, राजेभाउ उत्तम कोल्हे, दत्तात्रय शिवाजी आरडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सलग तिस–यांदा शालेय समिती निवड बिनविरोध होणारी ही शाळा ठरली आहे. निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी, जेष्ठ अधिव्याख्याता श्रीकिशन देशमुख, विस्तार अधिकारी श्री. राठोड, श्रीमती कापसे, लक्ष्मण पोटभरे, आयाज सिद्दीकी, सचिन मोती यांनी अभिनंदन केले आहे. निवडीसाठी निरीक्षक म्हणुन केंद्रप्रमुख समाधान शिंदे यांनी काम पाहिले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला. यावेळी मा. सभापती सखाराम शिंदे, चेअरमन बबनराव शिंदे, राजेभाउ शिंदे, मा. उपसरपंच अण्णा शिंदे, संचालक आप्पा उजगरे, विक्रम रंजवे व गावातील पालक, शिक्षणप्रेमी नागरिक यांची उपस्थिती होती. निवडीसाठी मुख्याध्यापक पी. जी. देशपांडे, शिक्षक लक्ष्मण सरवदे, अंगद कवडे, उध्दव शिल्पे, भिमा राठोड, सत्यभान भुंबे, महादेव बोचरे, रेश्मा वंजारे, भारत राउत, श्री. भदर्गे, श्री. मुळे, राम कटारे, किशोर बोबडे यांनी सहकार्य केले.

## मुहूर्त ठरला! शिवसेना चिन्ह वादाचा मुद्दा;

● पान ३ वरून... घटनापीठाच्या सदस्यत्वामुळे सुनावणीची वेळ १९ ऑगस्टपासून १० सप्टेंबरपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे या काळात सुनावणी सुरू राहील आणि सर्व बाजूंचा मुद्दा समोर येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावरच निकाल येणार?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावरच शिवसेना पक्षाचा चिन्हाचा निकाल येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाने या प्रकरणाची तातडीने सुनावणी व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयात विनंती केली होती. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी या प्रकरणावर दोन वर्षे उलटली असल्याचे लक्षात घेत, “आम्ही एकदाच या प्रकरणावर निर्णय देऊ” असे सांगितले आणि प्रकरण लवकरात लवकर संपवण्याचा आश्वासन दिले. त्यानंतर सुनावणीसाठी २० ऑगस्टची तारीख निश्चित करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अगोदरच शिवसेना पक्षासाठी चिन्हाचा अंतिम निर्णय येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे पक्षाची आगामी निवडणूक धोरणे आणि तयारी यावर थेट परिणाम होऊ शकतो.

## नवगाव येथील मातंग समाज स्मशान भूमी रस्त्यावरील अतिक्रमण हटवा : मागणी

पैठण : सर्जेराव खडसन

नवगाव येथे चार ते पाच दिवसापूर्वी मातंग समाजातील एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. परंतु मातंग समाजाच्या स्मशान भूमीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर गावातील काही लोकांनी अनेक वर्षांपासून अतिक्रमण केल्याले असल्याने येथील मातंग समाजातील नागरिकांना समाजातील कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाला तर स्मशान भूमीत त्या मृतदेहाचे अंत्यसंस्कार करण्यासाठी घेऊन जाण्याकरीता रस्ताच नसल्याने त्यांचीवर्षानुवर्ष मोठी कुचंबना होत होती.

अखेर दि.( ९ ) शनिवार रोजी त्यांच्या सहनशीलतेचा अंत होऊन त्यांनी गावातील एका मातंग समाजातील व्यक्तीचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला असता त्याचा मृतदेह थेट ग्राम पंचायत कार्यालयासमोर आणून ठेवत रस्ता उपलब्ध करून द्या नाहीतर मृतदेहाचे अंत्यसंस्कार येथेच करणार असल्याची ठाम भूमिका घेतल्याची खळबळजनक घटना घडल्याने गावामध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे उशीरा का होईना नवगाव ग्राम पंचायतीचा कारभार हाकनाऱ्या कारभाऱ्यांना शेवटी जाग आल्याने त्यांनी मातंग समाज बांधवांच्या स्मशान भूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही स्थानीक लोकांकडून करण्यात आलेले अतिक्रमण तहसील प्रशासनाने हस्तक्षेप करत तत्काळ हटवण्या संदर्भात पैठण तहसीलदार ज्योती पवार यांच्यासी नवगाव येथील मातंग समाज व ग्रामपंचायत कार्यालयाच्या कारभाऱ्यांनी चर्चा करून निवेदन दिले.

यावेळी नवगावचे माजी सरपंच किशोर चौधरी, उपसरपंच युसुफ पठाण, ग्रा.पं. सदस्य मनोज गायके, यांच्यासह लहू गवळी, शरद धंतोले अजीम पठाण, बबनराव गंवादे, कडु गवळी, आनिल घोडेराव, हरिभाऊ गवळी, रोहित गवळी, बाबासाहेब कापसे, सुनिल गवळी, सुनिल लसगरे, सागर शर्मा, शाम गवळी, सागर शर्मा, आकाश गवळी, विशाल लासगरे, सुनिल गवळी, रोहित गवळी, विशाल लसगरे, किरण गवळी यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

### “अवयवदान – जीवनाची संजीवनी!”

## गुरुमाऊली आयुर्वेद महाविद्यालयात अवयवदान जनजागृती कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



माजलगाव : परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, माजलगाव येथे भारत सरकारच्या “अवयवदान – जीवन संजीवनी अभियान” अंतर्गत अवयवदानाबाबत जनजागृती करण्यासाठी शरीर रचना विभागाच्या वतीने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अभियानाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्रा. डॉ. संतोष वामन शिंदे ( विभागप्रमुख, वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक ) यांनी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना अवयवदानाचे वैज्ञानिक, सामाजिक, वैद्यकीय आणि कायदेशीर पैलू सखोलपणे उलगडून दाखवले. त्यांनी अवयवदान संबंधित नियम, गरज आणि समाजातील जागृतीची भूमिका अधोरेखित केली. प्रा. डॉ. शिवरत्न शेटे सर यांनी अवयवदान प्रक्रियेतील कायदे व नैतिकतेचा अभ्यास विद्यार्थ्यांसमोर मांडत त्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमात संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. अमित बिंदू सर, प्रा. वांडरे सर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच या कार्यक्रमासाठी प्राचार्या डॉ. जयश्री पाटील मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. गुरुमाऊली आयुर्वेद महाविद्यालयाचे शरीर रचना विभागप्रमुख डॉ. अतुल बिर्ला सर व डॉ. साबेर शेख सर यांनी या उपक्रमाचे प्रभावी नियोजन व समन्वय साधला.

सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेत उत्साहात उपस्थित राहून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाच्या शेवटी चर्चासत्र व आभार प्रदर्शनाने समारोप करण्यात आला.

सकारात्मक कार्याचे सर्वत्र होतेय कौतुक

➤ शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे यांनी गुरू प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे केले कौतुक

# शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम गोरगरीब घटकांना उर्जा देणारा!



गेवराई : प्रतिनिधी

शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम अत्यंत सुंदर असा उपक्रम असून, गोरगरीब विद्यार्थ्यांना नवी उर्जा देणाराआहे. सामाजिक कार्यात सक्रिय राहून, शालेय साहित्य वाटपाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानदीप पेटवून, गुरू आनंद महिला प्रतिष्ठानने सामाजिक भान राखले आहे. अशा स्तुत्य उपक्रमाला समाजाने तन मन धनाने हातभार लावला पाहिजे. असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे यांनी येथे बोलताना केले आहे.

मंगळवार ता. 12 रोजी गेवराई येथील जिल्हा परिषद शाळेत, गुरू आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई शहरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

व्यासपीठावर शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती सीमाताई ओस्तवाल मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट, कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक विष्णू सोळुंके, पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर ज्येष्ठ पत्रकार विनोद नरसाळे, पत्रकार अँड. हारूण शेख यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री बापूसाहेब तारुकर सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी गेवराई शहरातील जिल्हा परिषदच्या सर्व शाळा सहभागी झाल्या होत्या. सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना एकूण 50 हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. गुरू आनंद महिला प्रतिष्ठान व प्रयास फाउंडेशन च्या वतीने तालुक्यातील व जिल्ह्यातील अनेक शाळांना जवळपास एक कोटी रुपयांची शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. समाजातील मागास घटकातील मुले शैक्षणिक प्रवाहात यावीत ती टिकावीत व जिल्ह्याचा शैक्षणिक विकास व्हावा, या उद्देशाने हा कार्यक्रम गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होता. विष्णू सोळुंके, राजकुमार पोपळघट, शिवाजी झेंडेकर यांनी ही आपले विचार व्यक्त केले.

श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांनी सांगितले की, सामाजिक कार्य आपली बांधिलकी आहे. गोरगरीब घटकांना होईल तेवढी मदत करत आलो आहोत. या पुढे ही, हा उपक्रम सुरूच राहणार आहे. पंधरा वर्षापासून जिल्ह्यामध्ये शैक्षणिक साहित्य वाटप, कोरोना काळात धान्य किराणा वाटप तसेच दुष्काळग्रस्तांना मदत अशा प्रकारचे उपक्रम प्रतिष्ठानने राबविले आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये या प्रतिष्ठानने शैक्षणिक साहित्य वाटप केल्याचे त्यांनी सांगितले तसेच येणाऱ्या काळातही ही चळवळ अशीच चालू राहील अशा प्रकारची ग्वाही दिली. सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. जिल्हा परिषदच्या सर्व शाळातील मुले ही गरजवंत व गरीब परिस्थितीतील आहेत. विद्यार्थ्यांनी देखील सीमाताई यांचे आभार मानले. याप्रसंगी जिल्हा परिषद जायकवाडी वसाहत गेवराई या केंद्रातील सर्व शिक्षक बंधू, भगिनी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कवियत्री राजश्री मिसाळ मॅडम, श्रीमती केशर शिंदे यांनी केले. उपस्थितांचे आभार श्रीमती मयुरी भंडारे यांनी मानले.